दैनिक
# लोकांकीत
सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र
मुख्य संपादक–संजय पवार

### ३२५९ नागरिकांचे स्थलांतर

**मुंबई**–मराठवाड्यातील पूर परिस्थितीमुळे ३२५९ नागरिकांना त्यांच्या घरातून सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. यात बीडमधील १११५, परभणीमधील १२३८, जालन्यातील ९०, धाराशिवमधील ४९८ तर नांदेडमधील ३०९ नागरिकांचा समावेश आहे. पूरात अडकलेल्या या सर्व नागरिकांना बाहेर काढण्यासाठी मराठवाड्याचे प्रशासन आणि एनडीआरएफ तसेच आर्मीच्या पथकाने मदत केली आहे.अतिवृष्टीमुळे केवळ जीवितहानी नव्हे तर पिकांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

### शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे

**मुंबई**–छगन भुजबळ यांनी आरक्षणावरील मत मांडतानाच शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरही भूमिका स्पष्ट केली. येवला तालुक्यातील पुरग्रस्त भागांची पाहणी करताना त्यांनी सांगितलं की, अतिवृष्टीमुळे कांदा, मका, सोयाबीन, टोमॅटो आणि द्राक्षबागांचे प्रचंड नुकसान झालं आहे. शेतकरी हवालदिल झाले आहेत. काही ठिकाणी जमिनी खरडून गेल्या आहेत. द्राक्षबागा पुन्हा उभ्या करण्यासाठी तीन–चार वर्षं लागतील. पण सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असा विश्वास त्यांनी दिला.

• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/74482 • शुक्रवार दि.२६ सप्टेंबर २०२५ • अंक–०९ • दैनिक • पाने ४ • पान १ • किंमत २ रु. • ( ई पेपर)

## पूरस्थितीमुळे वैद्यकीय विभागाच्या परीक्षा रद्द

# एमपीएससी २८ सप्टेंबरला होणारी परीक्षाही पुढे ढकलण्याची विद्यार्थ्यांची मागणी

**मुंबई (वृत्तसंस्था)**–मराठवाडा, विदर्भ आणि अन्य भागांत झालेल्या अतिवृष्टी आणि पूर स्थितीमुळे स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान झाले आहे. पूर आणि वाहतूक विस्कळीत झाल्यामुळे अभ्यासावर मोठा परिणाम झाला असून, येत्या २८ सप्टेंबर रोजी होणारी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची राज्यसेवा पूर्व परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी विद्यार्थ्यांकडून होत आहे. दरम्यान, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने २५ आणि २६ सप्टेंबर रोजी होणाऱ्या परीक्षा पुढे ढकलल्या आहे. यासंदर्भात संबंधित विभागाने एक परिपत्रक देखील जाहीर केले आहे.गेल्या काही दिवसांपासून मराठवाडा परिसरात पूर स्थितीमुळे अनेक ठिकाणी वाचनालये बंद आहेत, तर अनेक विद्यार्थ्यांचे अभ्यास साहित्य वाहून गेले किंवा खराब झाले आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. सध्या पूर स्थितीमुळे गाव आणि शहरांना जोडणारे रस्ते खचले आहेत. अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. अशा परिस्थितीत परीक्षा केंद्रांवर वेळेवर पोहोचणेही अनेक विद्यार्थ्यांसाठी अवघड झाले आहे. परिणामी, परीक्षा पुढे ढकलल्यास तयारीसाठी आणि परीक्षा केंद्रांवर पोहोचण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल, अशी अपेक्षा विद्यार्थी व्यक्त करत आहेत.दरम्यान, राज्यातील पूर परिस्थितीमुळे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने त्यांच्या अधिपत्याखालील गट–क तांत्रिक/अतांत्रिक संवर्गातील पदांसाठी २५ सप्टेंबर व २६ सप्टेंबर रोजी आयोजित केलेली ऑनलाईन स्पर्धा परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे.वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने यासंदर्भात परिपत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार, अधिपत्याखालील शासकीय / दंत महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयातील गट–क तांत्रिक/अतांत्रिक संवर्गातील सरळसेवा कोट्यातील रिक्त पदे भरण्याकरिता राज्यस्तरीय ऑनलाईन स्पर्धा परीक्षा राज्यातील विविध केंद्रावर सुरु आहे.सोलापूर जिल्ह्यासह महाराष्ट्रात विविध ठिकाणी मागील आठवड्यापासून अती मुसळधार पावसामुळे राज्यामध्ये आपत्कालीन पूरपरिस्थिती निर्माण झाल्याने २५.०९.२०२५ व २६.०९.२०२५ रोजीची आयोजित करण्यात आलेली परीक्षा पुढे ढकलण्यात येत आहे. याबाबतचे सुधारीत वेळापत्रक प्रसिध्द करण्यात येईल, असे जाहीर करण्यात आले आहे.वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या परीक्षा पुढे ढकलल्यानंतर आता महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) काय निर्णय घेणार, याकडे लाखो उमेदवारांचे लक्ष लागले आहे.एमपीएससीने २०२५ पासून अभ्यासक्रमात मोठा बदल केला आहे. या बदलानंतरची राज्यसेवा पूर्व परीक्षा पहिल्यांदाच २८ सप्टेंबरला होणार आहे. ऐनवेळी आलेल्या या नैसर्गिक संकटामुळे अभ्यासक्रम बदलामुळे आधीच तणावाखाली असलेल्या उमेदवारांसमोर आता नवी अडचण उभी राहिली आहे. राजभरातील लाखो उमेदवारांनी या परीक्षेसाठी अर्ज केले असून, आयोगाने विद्यार्थ्यांच्या अडचणींचा विचार करून लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणी होत आहे.



## राज ठाकरे यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

### अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी 'ओला दुष्काळ' जाहीर करण्याची मागणी



**मुंबई (वृत्तसंस्था)**–महाराष्ट्रात अतिवृष्टीने हाहाकार माजवला आहे. अनेकांचे घर उद्ध्वस्त झाले आहेत. शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत सरकारने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची पाहणी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज सोलापूरसह धाराशिव व लातूरच्या दौऱ्यावर होते. तसेच त्यांनी शेतकऱ्यांना नुकसानभरपाईसाठी निर्देश जारी केले आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवले आहे.

पत्रात राज ठाकरे म्हणाले, महाराष्ट्रात अतिवृष्टीने जो धुमाकूळ घातला आहे, त्याबद्दल तुम्ही पूर्णपणे अवगत असालच. महाराष्ट्राचा असा कुठलाही भाग शिल्लक राहिलेला नसेल जिथे अतिवृष्टीने नुकसान केलं नसेल. आमच्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांशी बोलल्यावर, लक्षात आलं आहे की, कित्येक ठिकाणी जमीन पूर्णपणे खरवडून वाहून गेलेली आहे. मे महिन्याच्या मध्यात जो पाऊस सुरु झाला आहे, त्याने जवळजवळ उघडीप घेतलीच नाहीये त्यामुळे, शेतीचं अतोनात नुकसान झालं आहे. ग्रामीण महाराष्ट्राची अर्थव्यवस्था पूर्णपणे उध्वस्त झाली आहे.

## लोकनेते गणेश नाईक यांच्या वाढदिवसा निमित्त विधवा व विधुर महीलांचा सम्मान






**मुंबई । प्रतिनिधी**

वनमंत्री गणेश नाईक यांच्या वाढदिवसाच्या निमित्त आयोजित अभिष्टचिंतन पंधरवड्यातील आज च्या ११व्या दिवशीनवी मुंबईत ठिकठिकाणी लोकोपयोगी व सेवाभावी उपक्रम घेण्यात आले.आज सकाळी वाशीगाव येथे नवी मुंबई महापालिकेचे माजी महापौर सुधाकर सोनावणे व माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांच्या उपस्थितीत महिला सक्षमिकरणा अंतर्गत विभागातील निवासी एकल ( विधवा व विधुर) महिलांचा सन्मान, महाराष्ट्र शासनाच्या शिधावाटप अधिकारी यांचे आपले घर – आपले राशन याबाबत शिबीर, टपाल खात्यातील विविध बचत योजनांच्या बाबतीत मार्गदर्शन शिबीर हे उपक्रम संपन्न झाले.यावेळी माजी महापौर सुधाकर सोनावणे यांच्या हस्ते प्रभागातील आपल्या सहजीवनाची अमृतवर्षे पूर्ण केलेल्या जेष्ठ दांम्पत्यांचा सत्कार करण्यात आला. या अभिनव उपक्रमाचे माजी महापौर सोनावणे यांनी कौतुक करताना त्यांच्या पुढील सहजीवनास मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या व आपले आशिर्वाद आमचे लोकनेते गणेश नाईक यांच्या मागे सदैव राहुद्यात असे नम्र आवाहन केले.वाशीगाव येथे युवानेते निशांत भगत व समाजसेवक संदीप भगत यांच्या पुढाकाराने प्रभात ट्रस्टचे डॉ. प्रशांत थोरात सहकार्याने नेत्र चिकित्सा शिबीर व डॉ. मिलिंद जोशी यांच्या सहयोगाने ब्लड प्रेशर व शुगर तपासणी शिबिराचे आयोजन सकाळी १० ते सायंकाळी ४ दरम्यान आयोजन करण्यात केले होते ज्याचा लाभ अनेक नागरिकांनी घेतला.वाशी रेल्वे स्टेशन येथे मध्य रेल्वे सेवेतील स्टेशन प्रबंधक, वाशी रेल्वे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तिकिट तपासणीस, तिकिट बुकिंग कार्यालयातील महिला कर्मचारी, स्वच्छताकर्मी यांचा सन्मान कार्यकर्त्यांनी केला.

## एकही एकर पंचनाम्याविना राहू नये जमीन आणि विहिरींचेही पंचनामे करा–कृषि मंत्री दत्तात्रय भरणे



**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**–जालना जिल्ह्यात प्राथमिक स्वरूपात २ लाख ५४ हजार एकर क्षेत्राचं नुकसान झालं आहे. तर, ऑगस्ट व सप्टेंबरमध्ये प्राथमिक अंदाजानुसार राज्यात ३३ लाख ५१ हजार १७५ हेक्टर म्हणजे ८३ लाख ७७ हजार ९३७ एकर क्षेत्र बाधित आहे. सप्टेंबर महिन्यात जास्त पाऊस पडला आहे. सप्टेंबर पूर्वीचा विचार केला तर नुकसान थोडं कमी होतं. कृषी विभाग आणि महसूल विभागाकडून पंचनाम्याचं काम युद्ध पातळीवर सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे देखील आज नुकसानग्रस्त भागांची पाहणी करत आहेत त्यामुळे त्यांचं सर्व परिस्थितीवर बारकाईनं लक्ष आहे. लवकरात लवकर शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. अशी प्रतिक्रिया कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज जालना जिल्ह्यातील बदनापूर व अंबड तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी केली. सलग पडत असलेल्या पावसामुळं शेतकऱ्यांच्या पिकांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं असून, शेतकरी अडचणीत सापडला आहेत. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन मंत्री दत्तात्रय भरणे यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. पाहणीदरम्यान मंत्री भरणे यांनी अधिकाऱ्यांना थेट दूरध्वनीवरून सूचनादेखील दिल्या आणि काही ठिकाणी कामकाजातील सुस्तगतीबाबत नाराजी व्यक्त केली.पाहणी दरम्यान शेतकऱ्यांनी सोयाबीन, कपाशी, तूर यांसारख्या पिकांचे नुकसान, जमिनीवर पाणी साचल्याने उभ्या पिकांची झालेली हानी, रस्ते व पायाभूत सुविधांवर झालेला परिणाम याबाबत कृषी मंत्री भरणेंना माहिती दिली. यावर गांभीर्यानं लक्ष देत मंत्री भरणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ फोन लावून, एकही शेतकरी पंचनाम्यात वंचित नाही राहिला पाहिजे. नुकसान झालेल्या प्रत्येक शेतकऱ्याचा पंचनामा करण्यात यावा. शेती, गुरं, विहिरी या सर्व गोष्टींचे पंचनामे करा, असे आदेश मंत्री दत्तात्रय भरणे यांनी अधिकाऱ्यांना दिले.

मंत्री भरणे म्हणाले की, शेतकऱ्यांना न्याय मिळावा ही राज्य शासनाची प्राथमिकता आहे. कुठल्याही शेतकऱ्याला मदतीपासून वंचित ठेवलं जाणार नाही. ज्याचं नुकसान झालं, त्यांचं सगळं नुकसान नोंदवून घ्या. मी तुम्हाला मंत्री म्हणून सांगतो, शेतकऱ्याच्या एक गुंठ्याचा पंचनामा जरी राहिला तर त्याला तुम्ही जबाबदार असाल, असा इशारा त्यांनी अधिकाऱ्याला दिला. शेतकरी खूप अडचणीत आहे. तो वंचित राहणार नाही याची काळजी घ्या. असेही त्यांनी बजावले.

## चमकोगिरी करणाऱ्यांना चिखलात लोळवा राजू शेट्टी यांचा अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना सल्ला



**कोल्हापूर (वृत्तसंस्था)**–स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी अतिवृष्टीग्रस्तांना देण्यात येणाऱ्या मदत सामग्रीवर एकनाथ शिंदे व मंत्री प्रताप सरनाईक यांचा फोटो लावण्यावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. फोटो लावून तुटपुंजी मदत द्यायला तुम्हाला शेतकरी भिकारी वाटला का? असा संतप्त सवाल त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे.धाराशिव जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्तांना मदत करण्यासाठी सत्ताधारी शिवसेनेने मुंबई व ठाण्याहून काही मदतसामग्री पाठवली आहे. पण या सामग्रीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व धाराशिवचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांचे फोटो असल्यामुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. माजी खासदार राजू शेट्टी यांनीही यावर संताप व्यक्त केला आहे. ते म्हणाले, भारतीय संस्कृतीत उजव्या हाताने दिलेली मदत डाव्या हाताला कळू न देण्याची परंपरा आहे. पण हे सरकार काडीची मदत देत आहे आणि त्याचा मोठा गाजावाजा करत आहे. मदत द्यायचीच असेल तर झालेल्या सर्व नुकसानीची द्या. त्यानंतर तुमचा भला मोठा फोटो लावा.

शेतकऱ्यांनी अशी चमकोगिरी करणाऱ्यांना चिखलात लोळवले पाहिजे. शेतकऱ्याला देण्यात येणाऱ्या तुटपुंज्या मदतीवर नेत्यांचे फोटो, पक्षाचा लोगो व पक्षाचे नाव आहे. हे काय चाललंय? शेतकरी काय भिकारी आहे का? त्याची चेष्टा चालवली आहे का? पाण्यात बुडणाऱ्या माणसाला सरकार अतिशय तुटपुंजी मदत दिली आहे. आम्हाला तुमचे सगळे धंदे माहिती आहेत. पैसा कुठून कमावला हे ही माहिती आहे. शेतकऱ्यांची चालवलेली ही चेष्टा अतिशय संतापजनक आहे, असे राजू शेट्टी म्हणाले. ते पुढे म्हणाले, सध्या संपूर्ण मराठवाड्यात अतिवृष्टीमुळे हाहाकार माजला आहे. तिथे जणू काही जलप्रलय आल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीत शेतकऱ्यांचे अश्रू पुसायचे असतील, तर राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची गरज आहे. शेतकऱ्यांची सर्वच प्रकारची कर्जे माफ करायला हवेत. स्वतः मुख्यमंत्रीच सरासरीच्या ११० टक्के पाऊस पडल्याचे सांगत आहेत. ओला दुष्काळ जाहीर करण्यास याहून मोठा कोणता पुरावा पाहिजे. राज्यात १० मे पासून सातत्याने पाऊस पडत आहे.

## २९ सप्टेंबरपर्यंत राज्यात पावसाचा जोर कायम राहणार:मराठवाडा, विदर्भात अतिवृष्टीची शक्यता; पुढील पाच दिवस राज्यासाठी संकटाचे

**मुंबई (वृत्तसंस्था)**–हवामान विभागाच्या ताज्या अंदाजानुसार, २५ सप्टेंबरपासून २९ सप्टेंबरपर्यंत राज्यात पावसाचा जोर कायम राहणार आहे. विशेषतः २७ सप्टेंबर रोजी मराठवाडा आणि विदर्भात अतिवृष्टीची शक्यता वर्तवण्यात आली आहे. बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे पावसाची तीव्रता आणखी वाढण्याचा अंदाज आहे.याशिवाय कोकण, खानदेश आणि पश्चिम महाराष्ट्रातही पावसाची संततधार सुरू राहील, असा इशारा देण्यात आला आहे. पुढील काही दिवस राज्यात मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्यांचा सामना करावा लागू शकतो. यामुळे प्रशासनाने सर्व जिल्ह्यांना सतर्कतेचे आदेश दिले असून नागरिकांनी बाहेर जाणे टाळावे, असा सल्ला देण्यात आला आहे.महाराष्ट्रावर पुन्हा एकदा पावसाचा कहर दिसून येत आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. नद्या–नाले तुडुंब भरून वाहत आहेत, तर अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. खरीप हंगामाच्या शेवटच्या टप्प्यात आलेल्या या पावसामुळे शेतकऱ्यांच्या आशेवर पाणी फिरले आहे.जालना, बीड, लातूर, धाराशिव, परभणी यांसह मराठवाड्याच्या बहुतांश भागात उभी पिकं पाण्याखाली गेली आहेत. विदर्भातील कापूस आणि सोयाबीन पिकांचं प्रचंड नुकसान झालं आहे. नागरिकांना पुरामुळे सुरक्षित स्थळी हलवण्याची वेळ आली असून शाळा, मंदिरे आणि ग्रामपंचायत कार्यालयं तात्पुरत्या निवाऱ्यांमध्ये बदलण्यात आली आहेत. या अनिश्चित पावसामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत आणि त्यांचा हंगाम वाया जाण्याची भीती व्यक्त होत आहे.



# अभिनयाचा बादशहा अशोक सराफ यांच्या स्वागतासाठी उलवे नगरी सज्ज

## मान्यवरांच्या साक्षीने होणार अशोक सराफ यांचा रविवारी भव्य नागरी सत्कार

**उलवे | प्रतिनिधी**

मराठी चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेते, 'पद्मश्री' आणि 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कारप्राप्त, अभिनयाचे बादशहा अशोक सराफ यांचा सपत्निक भव्य नागरी सत्कार रविवारी (ता. २८) उलवे नोडमधील 'भूमिपुत्र भवन' येथे मान्यवरांच्या साक्षीने होणार आहे. रायगड, नवी मुंबईतील सर्वसामान्य नागरिकांच्या वतीने हा नागरी सत्कार होणार आहे. हा सत्कार समारंभ शेलघर येथील यमुना सामाजिक संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी आयोजित केला आहे. यासाठी उलवे नगरी सज्ज झाली आहे.

या सत्कार समारंभाला राज्याचे वनमंत्री गणेश नाईक, रायगडचे खासदार सुनील तटकरे, माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय गृहमंत्री आणि आंध्र प्रदेशचे माजी राज्यपाल सुशीलकुमार शिंदे, माजी खासदार रामशेठ ठाकूर उपस्थित राहणार आहेत. गेली अनेक दशके मराठी मनावर अधिराज्य गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते, रसिकांना खळखळून हसविणारे अवलिया अशोक सराफ यांना मानाचा मुजरा करण्यासाठी रसिक आतुर आहेत. या सत्कार सोहळ्याला रसिकांना विनामूल्य प्रवेश आहे.

आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत म्हणतात, ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांनी मराठी मनावर अधिराज्य गाजवले आहे. त्यांच्या अनेक चित्रपटांमुळे रसिकांना मनमुराद आनंद मिळाला आहे. अनेक पिढ्यांनी त्यांच्या चित्रपटांचा आस्वाद घेतला आहे. त्यांना चित्रपटसृष्टीतील कारकिर्दीबद्दल आजपर्यंत अनेक पुरस्कारांनी गौरविले आहे, याचा मला अतिशय आनंद आहे. त्यांचा यथोचित गौरव मराठी मनातर्फे व्हावा, असे मला वाटत होते. त्यामुळेच त्यांच्या भव्य नागरी सत्काराचे आयोजन केले आहे.



# शारदीय नवरात्रोत्सवात महेंद्रशेठ घरत यांनी घेतले पहिल्याच दिवशी वैष्णोदेवीचे दर्शन








**उलवे | प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी सोमवारी (ता. २२) नवरात्रोत्सवानिमित्त वैष्णोदेवीचे पहिल्याच दिवशी दर्शन घेतले. सकाळी पहाटेच वैष्णोदेवीचे दर्शन झाल्याने त्यांना अत्यानंद झाला.

यावेळी ते म्हणाले, वैष्णोदेवीचे शारदीय नवरात्रोत्सवात पहिल्याच दिवशी दर्शन घेण्याचा नित्यक्रम गेली २१ वर्षे अखंडपणे सुरू आहे. तो यापुढेही कायम राहील. देवीच्या दर्शनाने मला नवीन ऊर्जा मिळते. माझी अधिकाधिक भरभराट होते, हा माझा अनुभव आहे.

दरम्यान, वैष्णोदेवीचे दर्शन घेऊन आल्यानंतर महेंद्रशेठ घरत यांनी उरण, पनवेलमधील अनेक गावांत जाऊन सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळांना भेट देऊन देवीचे दर्शन घेतले. अनेक नवरात्रोत्सव मंडळांना यावेळी त्यांनी यथोचित देणगीही दिली. उरणमधील मा वैष्णो दरबार मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त कालिकामाता आणि सरस्वती देवी यांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी महिलांनी महेंद्रशेठ घरत यांचे आरती ओवाळून स्वागत केले.

# घटस्थापनेचा 'घट' मुहूर्त

देशातील करपद्धतीत मूलभूत बदल करणारी वस्तू व सेवा कर (जीएसटी) प्रणाली सन २०१७मध्ये अमलात आली. करांचे चार टप्पे व कागदपत्रांच्या सादरीकरणातील कमालीची क्लिष्टता हे त्यात जन्मजात असे प्रमुख दोष होते. त्यामुळे या दोषांच्या निवारणाची विनंती/ मागणी विविध घटक तेव्हापासूनच करीत होते. अखेर त्या दोषांचे निवारण करून नव्या सुधारित स्वरूपातील जीएसटी प्रणाली लागू झाली आहे.जीएसटीमधील 'घट' लागू करण्यासाठी नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवसाचा, घटस्थापनेचा मुहूर्त मोदी सरकारने निवडला. नव्या जीएसटी रचनेमुळे विविध खाद्यपदार्थांपासून ते आरोग्य-जीवन विम्यापर्यंत अनेक गोष्टींसाठी आधीच्या तुलनेत कमी पैसे मोजावे लागणार असल्याने सामान्य नागरिकांत दिलाशाचे वातावरण आहे, ते अगदी स्वाभाविक म्हणायला हवे. वस्तूंच्या किमती घटल्याने त्याचा खप व पर्यायाने उत्पादन वाढते आणि एकंदरच अर्थचक्रास गती मिळते, हा बाळबोध नियम.



आत्ता सुरू असलेला नवरात्रोत्सव आणि येऊ घातलेली दिवाळी अशा पार्श्वभूमीवर अर्थचक्रास गती मिळणे सामान्यांच्या व देशाच्याही लाभाचे.जीएसटीतील कपातीमुळे होणारी स्वस्ताई सामान्यांपर्यंत पोचवणे ही आता उत्पादकांची जबाबदारी आहे. त्याचवेळी, हा निर्णय होण्याआधी कच्चा माल खरेदी केला अधिक दराने व त्यातून निर्माण झालेला पक्का माल आता विकावा लागणार कमी दराने, असा मुद्दा सोमवारी मोठ्या प्रमाणात उत्पादकांकडून मांडला गेला. यावरून अद्याप असलेला गोंधळ तातडीने दूर करणे ही आता सरकारची जबाबदारी आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आततायी निर्णयांमुळे जागतिक अर्थव्यवस्थेत अस्थिरता आहे. त्यांच्या आयातशुल्क निर्णयाचा मोठा फटका भारतालाही बसू शकतो. त्या फटक्याची तीव्रता कमी करण्याचे काम जीएसटी कपातीचा निर्णय करू शकतो, असे तज्ज्ञ मानतात.या सगळ्यांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'स्वदेशी'चा धरलेला आग्रह महत्त्वाचा मानायला हवा. पण असा आग्रह हा केवळ भावनिक आवाहनांपुरता उरता कामा नये. सरकारला मनापासून वाटत असेल तर, आजच्या जागतिकीकरणाच्या काळातही 'स्वदेशी'ची अंमलबजावणी देशासाठी व देशवासीयांसाठी कशी व्यवहार्य व फायदेशीर ठरू शकते, हे सरकारने पटवून द्यावे लागेल. त्याच्या अंमलबजावणीसाठी ठोस अशी काही रचना उभारावी लागेल. त्यात सातत्य राखावे लागेल. अर्थकारण हे भावनांच्या हिंदोळ्यावर चालत नाही. तेथे रोकडे सत्यच लागते, हे सरकार जाणत असणारच, ही अपेक्षा.

# जयंत पाटिल यांच्या बाजूने सहानुभूतीची लाट

दक्षिण महाराष्ट्राचे राजकारण गेल्या काही दिवसांत एका वक्तव्यामुळे प्रचंड ढवळून निघाले आहे. आमदार गोपीचंद पडळकर यांनी जत तालुक्यातील सभेत राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) माजी प्रदेशाध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांच्यावर केलेली वैयक्तिक टीका राज्यभरातील राजकीय वातावरण तापवून गेली. पडळकर यांनी जयंत पाटील यांच्या वडिलांचा उल्लेख करत केलेले विधान हे केवळ व्यक्तीवरचा हल्ला नसून संपूर्ण पाटील कुटुंबाच्या प्रतिष्ठेवर घाव घालणारे असल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यामुळे या संघर्षात जयंत पाटील यांच्या बाजूने सहानुभूतीची लाट आहे.

पाटील कुटुंबाची दक्षिण महाराष्ट्रात सहकार क्षेत्रातील प्रचंड पकड आहे. स्व. राजारामबापू पाटील यांनी या भागात सहकाराचा पाया रचला आणि जयंत पाटील हे त्याचे वारसदार म्हणून आजही लोकांच्या मनात आदराचे स्थान राखून आहेत. त्यांचा शांत, संयमी आणि मुद्देसूद वक्ता म्हणून असलेला ठसा जनमानसात खोलवर रुजलेला आहे. त्यामुळे पडळकर यांच्या वक्तव्यामुळे पाटील यांची प्रतिमा आणखी दृढ झाली असून, लोकांमध्ये त्यांच्याविषयी सहानुभूती निर्माण झाली आहे. या वादाची पार्श्वभूमी पाहता, जत तालुक्यात एका सरकारी अभियंत्याच्या आत्महत्येप्रकरणी पडळकर यांच्यावर आरोप झाले होते. त्यावरून महाविकास आघाडीच्या स्थानिक नेत्यांनी आंदोलन छेडले. यामध्ये राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांनी एकत्र येऊन पडळकर यांच्यावर तोफ डागली. संतापाच्या भरात पडळकर यांनी जयंत पाटील यांच्यावर वैयक्तिक टीका केली आणि वाद अधिक भडकला. यामुळे महाविकास आघाडीला एकत्र येण्यासाठी मुद्दा मिळाला, तर भाजपला बचावात्मक भूमिका घ्यावी लागली. वाद उफाळल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसने राज्यभर आंदोलने केली. पडळकरांच्या प्रतिमा जाळण्यात आल्या. जितेंद्र आव्हाड यांनी हे वक्तव्य महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशावरचा आघात असल्याचे म्हटले. काँग्रेसचे सतेज पाटील, विजय वडेट्टीवार यांच्यासह रोहित पवार आणि अमोल कोल्हे यांनीही तीव्र निषेध नोंदवला. इतकेच नव्हे तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही भाजपला कानपिचक्या दिल्या. पडळकर यांनी मात्र माफी मागण्यास नकार दिला आहे. 'मी राजकीय मुद्द्यांवर बोललो, वैयक्तिक नाही,' असे ते ठामपणे सांगतात. पण त्यांच्या या भूमिकेमुळे भाजपमध्येही अस्वस्थता आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पडळकरांना समज दिल्याचे सांगितले असले, तरी भाजपमधील कोणीही मोठा नेता खुलेपणे त्यांच्या बाजूने उभा राहिलेला नाही. उलट, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हे वक्तव्य महायुतीसाठी डोकेदुखी ठरू शकते, असे मत व्यक्त होत आहे.या संपूर्ण प्रकरणात महत्त्वाचे म्हणजे जयंत पाटील यांनी शांतता आणि संयमाची भूमिका घेतली आहे. त्यांनी थेट प्रतिक्रिया न देता, आपल्या परिपक्व राजकीय शैलीत या वादाला उत्तर दिले आहे. यामुळे त्यांच्याविषयी लोकांमध्ये आदर अधिकच वाढला आहे. 'टप्प्यात आला की कार्यक्रम करतो' असे ठसठशीत वक्तव्य करणारे आणि आवश्यकतेनुसार विरोधकांना चपखल उत्तर देणारे जयंत पाटील यांना असा वैयक्तिक हल्ला सहन करावा लागल्याने सामान्य लोकांतून त्यांना सहानुभूती मिळत आहे. सोमवारी सांगलीत होणाऱ्या मोर्चात स्वतः प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे जयंत पाटील यांच्या बाजूने उभे राहणार आहेत. यामुळे या संघर्षाला प्रादेशिक पातळीवरच नव्हे तर राज्यव्यापी रंग मिळणार आहे. दक्षिण महाराष्ट्रातील सहकाराची ताकद, जयंत पाटील यांचा शांत स्वभाव आणि पडळकर यांची आक्रमक प्रतिमा या सगळ्या घटकांच्या पार्श्वभूमीवर हा वाद निवडणुकांपर्यंत तापत राहील, यात शंका नाही. पडळकर यांनी केलेल्या वक्तव्यामुळे भाजपला ओबीसी-मराठा समाजातील तणावाचा सामना करावा लागू शकतो, तर जयंत पाटील यांच्या बाजूने सहानुभूतीची लाट निर्माण होऊन त्यांचा राजकीय दरारा अधिक मजबूत होईल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. पडळकर दोन पावले मागे येतात का, भाजप कारवाई करते का आणि मुख्यमंत्री एकूण काय भूमिका घेतात याकडे आता दक्षिण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.



राजकीय खेळीचे सूत्र सांगलीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने काढण्यात आलेला संस्कृती बचाव महामोर्चा हा फक्त सांस्कृतिक वारसा जपण्याचा प्रयत्न नाही, तर त्यामागे ठळक राजकीय गणितेही दडलेली दिसतात. त्यासाठीच हजारो लोकांना सांगलीत निमंत्रित करण्यात आले. राष्ट्रवादीच्या पहिल्या फळीतील सगळे नेते शिवाय मित्र पक्षातील महत्त्वाच्या नेत्यांना विनंती करून निमंत्रित करण्यात आले त्यानुसार प्रचंड गर्दीही जमली. सांगली व परिसर हा ऐतिहासिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक परंपरेसाठी प्रसिद्ध आहे. येथील लोकसंस्कृती, नाट्यकला, साहित्य आणि शैक्षणिक संस्था या शहराची ओळख आहे. अशा ठिकाणी संस्कृती धोक्यात आहे असा सूर लावून राष्ट्रवादीने मोर्चा उभारणे हे थेट राजकीय संदेश देणारे पाऊल आहे.महाविकास आघाडीतील अंतर्गत ताणतणाव, भाजपची वाढती घुसखोरी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांतील समीकरणे या सर्वांचा विचार करता, राष्ट्रवादीसाठी हा मोर्चा हा स्वतःची ताकद दाखवण्याचा प्रयत्न ठरतो. संस्कृती या भावनिक मुद्द्याचा आधार घेऊन जनतेचे लक्ष वेधणे आणि त्यामागे सत्ताधाऱ्यांची अकार्यक्षमता दाखवणे, हे उद्दिष्ट स्पष्ट दिसते. विशेषतः तरुणाई आणि बुद्धिजीवी वर्गात राष्ट्रवादीची पकड मजबूत करण्यासाठी 'आपली संस्कृती धोक्यात' हा मुद्दा सोपा आणि परिणामकारक ठरतो. यामागे आणखी एक खेळी म्हणजे स्थानिक नेत्यांचे वर्चस्व निर्माण करणे.सांगलीत काँग्रेस, भाजप आणि राष्ट्रवादीचे गटांतर अनेकदा चर्चेत असते. त्यामुळे या मोर्चाच्या माध्यमातून स्थानिक नेते आपली जनाधारशक्ती दाखवू शकतील, पुढील महापालिका व विधानसभा निवडणुकांपूर्वी पक्षश्रेष्ठींना आपले राजकीय वजन दाखवता येईल. थोडक्यात, राष्ट्रवादीचा संस्कृती बचाव महामोर्चा हा सामाजिक-सांस्कृतिक आवाहन असले, तरी त्यामागील खरी ताकद ही राजकीय समीकरणे बदलण्याची धडपड आहे. संस्कृतीच्या रक्षणाच्या नावाखाली मतदारांना एकत्र आणणे, विरोधकांना कोपरखळी देणे आणि आगामी निवडणुकांची पूर्वतयारी करणे हेच या खेळीचे मुख्य उद्दिष्ट म्हणता येईल.

संपादकीय

# महाराष्ट्रात महाप्रलय



महाराष्ट्रावर महाप्रलयाचं संकट आलं आहे. नेहमीपेक्षा थोडा लवकरच सुरू झालेला पाऊस नवरात्रीतही आषाढासारखा कोसळतो आहे. अहिल्यानगरच्या दक्षिण भागापासून मराठवाड्याला कवेत घेत या पावसाने अर्ध्या विदर्भालाही अक्षरशः झोडपून काढलं आहे. सोलापूर आणि जळगाव जिल्ह्याचा काही भागही या पावसाच्या तडाख्यात सापडला आहे. जेमतेम पर्जन्यमानाच्या या प्रदेशाला कोकणापेक्षा अधिक मुसळधार पाऊस सोसणं कठीण आहे. पावसाच्या दीर्घकाळ आणि काही ठिकाणी ढगफुटीसारख्या कोसळण्याने या भागातील जनजीवन पूर्ण उद्ध्वस्त झालं आहे. विशेषतः शेतीचं झालेलं नुकसान अपरिमित आहे. महाराष्ट्राला मे महिन्यापासून पावसाचे चातकापेक्षाही जास्त वेध लागतात. अनेक ठिकाणी पाणीटंचाई जाणवू लागते. टँकरने होणारा पाणीपुरवठाही अपुरा पडू लागतो. माणसांना स्वतःच्या गरजा आणि पाळीव जनावरांच्या पाण्याच्या गरजा कशा भागवायच्या असा प्रश्न सतावत असतो. त्यामुळे, एकदा पाऊस सुरू झाला, की निम्मा महाराष्ट्र सुटकेचा निःश्वास टाकत असतो. राज्याचा त्यापेक्षा अधिक भाग पावसाने धरणं भरावी, तळी-विहिरी भराव्यात एवढीच माफक अपेक्षा ठेवून असतो. यावर्षी अनेक ठिकाणी ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीलाच पाणी चांगलं भरलं. जलाशय तुडुंब झाल्याने ग्रामीण भागात समाधान पसरलं. लोक उत्साहात होते. पण, ऑगस्टच्या शेवटापासून पावसाने आणखी जोर धरला तेव्हाच निम्म्या महाराष्ट्राचे धाबे दणाणले. नंतरच्या पावसाने शेतीचं, फळबागांचं नुकसान सुरू केलं. मराठवाड्यात आणि उत्तर महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यात याच काळात ढगफुटीसदृश पाऊस झाला.परतीचा पाऊस जाता जाता दोन-चार ठिकाणी तडाखा देत असतोच. तसा इतिहास आहे. त्यामुळे, ऑगस्ट महिन्याच्या अखेरीला झालेलं नुकसान तिथेच थांबेल, अशी अटकळ होती. पण, प्रत्यक्षात पावसाचा जोर आणखी वाढला. सप्टेंबरचा दुसरा पंधरवडा उलटूनही पावसाचा जोर कमी होत नाही, हे लक्षात आलं, तेव्हाच जाणकारांना या वर्षीच्या महाराष्ट्रावरच्या संकटाची चाहूल लागली. अहिल्यानगरच्या दक्षिण भागातल्या दुष्काळी पट्ट्यातही असा पाऊस झाला, की गावंच्या गावं पुराने वेढली गेली. चारचाकी गाड्या वाहून जातील, एवढ्या वेगाने पाण्याचे प्रवाह ऐन गावांतून वाहत होते. गेल्या दोन दिवसांत पावसाचा हाच जोर सर्वदूर पसरला आहे. महाराष्ट्राचे अनेक जिल्हे आणि त्यातील अनेक तालुके अक्षरशः पाण्यात बुडाले आहेत.महाराष्ट्रात यापूर्वीही पूर आले, महापूर आले. पण, अनेक जिल्ह्यांत एकाचवेळी रबरी बोटी आणि लष्कराच्या हेलिकॉप्टरच्या मदतीने ग्रामस्थांची, नागरिकांची सुटका करण्याची वेळ आली नव्हती. ती यावेळी आली आहे. या महाप्रलयाला 'महा' का म्हटलं, ते यावरून लक्षात येईल. या पावसाळ्यात हिमालयात अनेक ठिकाणी ढगफुटी झाल्या. पर्वताचे मोठे भाग ढासळले. गावंच्या गावं वाहून गेली. पंजाबातही ३० जणांचा बळी घेऊन पावसाने आपला रुद्रावतार दाखवला. पण, महाराष्ट्रात पठारी भागात पावसाने सातत्याने आपलं तांडव चालवलं असल्याने या भागातल्या उभ्या पिकांचं, फळबागांचं, शेतजमिनींचं, गाईगुरांचं आणि लोकांच्या निवाऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. पावसाने गावंच्या गावं साफ केली आहेत. त्यांच्या पुनर्वसनासाठी सरकारला मोठी मदत करावी लागणार आहे. सुदैवाने या संकटाची चाहूल आधीच लागली असल्याने सरकारची यंत्रणाही बऱ्यापैकी तयारीत आहे. मंत्रिमंडळाच्या कालच्या बैठकीत त्यामुळे परिस्थितीचा आढावा घेऊन मदतीची प्राथमिक घोषणा झाली, ती दिलासादायक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पूरग्रस्तांना दिलेला दिलासाही खूपच आश्वासक ठरला आहे.

आपत्तीग्रस्त परिस्थितीचा पूर्ण आढावा घेऊन सर्व पंचनामे झाल्यानंतर एकत्रित मदत करण्याची पद्धत आतापर्यंत होती. यावेळी मात्र परिस्थितीनुसार जसजसे पंचनामे होत जातील, त्या त्या ठिकाणी त्यानुसार मदत पोहोचवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला, ही फार चांगली गोष्ट झाली. त्यामुळे, मदत लवकर पोहोचेल आणि पुनर्वसनालाही लवकर सुरुवात होईल. धोका एवढाच, की यामुळे पंचनाम्यांबाबतच्या तक्रारी दीर्घकाळ सुरू राहतील. त्या राहूच नयेत, यादृष्टीने स्थानिक प्रशासनाला सक्त सूचना देण्याची गरज आहे. या महाप्रलयातून ज्यांची सुटका करावी लागली, त्यांची संख्या शेकड्यात असली, तरी विस्थापितांची संख्या काही लाखांत असणार आहे. घरांची पडझड, शेतजमिनींचं नुकसान, शाळांच्या, तलाठी कार्यालय- ग्रामपंचायत इमारतींचं नुकसानही मोठं असणार आहे. एवढा सगळा भार राज्य सरकार एकट्याच्या बळावर उचलू शकेल, असं दिसत नाही. त्यासाठी केंद्र सरकारच्या सढळ मदतीची गरज जाणवणार आहे. देशात अनेक ठिकाणी हे अस्मानी संकट कोसळलं असल्याने केंद्र सरकारलाही त्याची जाणीव आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी त्या आनुषंगाने केंद्रातील महत्त्वाच्या मंत्र्यांना, अधिकाऱ्यांच्या पथकाला पाहणी करण्यास सांगून मदत जाहीर करतीलच. या मदतीचा समन्वय ठेऊन त्यातून प्रभावी काम होणं आणि कमीत कमी वेळेत ग्रामीण जीवन पूर्वपदावर आणणं हेच पुढचं आव्हान आहे. स्वयंसेवी, नागरी संस्थांनीही त्यासाठी लगेच पुढाकार घ्यायला हवा.

# सवाईच्या नावावर सद्या बाणेर मध्ये श्रेय घेण्यासाठी सरस्च ऐकवटले

## बाणेर मधील सफाई करिता मनपाला धारेवर का धरले नाही/कचरा उचलणारे आणि सफाई करणारे यांच्यावर अंकूश का नाही

**पुणे । रमेश जयस्वाल**

बाणेर विभागातील अनेक वर्षा कचरा समस्या जानवर असतांना ही आज कचरा समस्या बाबत जो तो निवडणूक आल्या कारनाने ऐकवटले दिसत आहे आज जो तो उठसुठ निवडणूक येत आहे म्हणून जनतेला दाखविण्याचा प्रयत्न करत आहे आज पाहता श्रेय वादाची लढाई कोणत्या दृष्टीने जाईल हे सांगता येत नाही निवडणूक महापालिकेच्या जवळ आहे आणि यात शितयुध्द सूरु आहे आज पाहता बाणेर बालेवाडी या विभागात स्वत:हून कोण कामे केली जनतेच्या भरवश्यार निवडून यायने आणि या पूरे वाटेल तसे वागायचे ही वृत्ति आज तरी मागिल माजी नगरसेवकांनी येणा-या निवडणूक लक्षात घेरे गरजेचे आहे निवडणूक जवळ आहे आज पर्यत कोण किती कामे केली तसेच जनतेची कामे करण्या कोण तत्पर राहलेला आहे हे दिसणारच आहे कोण जनतेच्या कामा करिता पूढे राहलेला आहे हे आज कोणीही सांगत नसले तरी पैश्याच्या जोरावर बाणेर बालेवाडी पाषाण सूस म्हाळूंगे अनेक पक्षातील नेते येणा-या महापालिकेच्या निवडणूक पहिले साम दाम दंड भेदचा वापर करून निवडणूक कोणता आणि कसा ? आज एक बाब लक्षात येते निवडणूक आली म्हणून नेते जागे झालेले आहे आज जनतेची समस्या जानवर आहे सर्व जनता म्हणते आपण झोपी गेले होते काय? कोणतीही निवडणूक आली की पक्षाचे नेते जागे होतात गेल्या मे महिन्या पासून या विभागात पावसाची थैमाड मांडले असतांना ही आजही जागो जागी रोडवर खड्डे पडून रस्त्याची दैना तसेच रोडवर पाणीच पाणी साचत असतांना आणि उन्ह्याळ्यात या विभागातील जनतेला पाण्याची समस्या जानवत असतांना आपला कारभार कोठे होता निवडणूका आल्या म्हणून आता तरी जनतेला धोका तरी देऊ नका.



# नवरात्र उत्सव व प्रारंभ घट यांची पारंपरिक परंपरेनुसार म्हात्रे कुटुंबातील देव्हाऱ्यात स्थापना

**उरण । विठ्ठल ममताबादे**

उरण तालुक्यातील गोवठणे गावातील फेमस युट्युबर तथा गोवठणे गावातील सामाजिक कार्यकर्ते प्रेम म्हात्रे यांच्या कुटुंबातील देव्हाऱ्यात घट स्थापना करण्यात आली.प्रेम म्हात्रे हे ज्या म्हात्रे कुटुंबातील देव्हाऱ्यात सदस्य आहेत त्या देव्हाऱ्यात नवरात्रोत्सव व घट स्थापना मोठ्या उत्स्फूर्त वातावरणात स्थापन झाले.सर्व मंगल मांगल्ये! शिवे सर्वार्थ साधिके!!

शरण्ये त्रंबके गौरी नारायणे नमोस्तुते!! असे जयजयकार करत जल्लोषमय वातावरणात घटस्थापना झाले.सर्व भारतात मोठ्या आनंदात आणि भक्तिमय वातावरणात घट स्थापना साजरा करण्यात आला. गोवठणे, ता- उरण येथे म्हात्रे कुटुंबियांतील कुलदैवत मंदिरामध्ये घट बसविणे, मंदिरातील देवदेवतांची, पूजा अर्चा, अभिषेक, शुद्धीकरण, नैवेद्य आणि सामूहिक आरतीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात, भक्तिमध्ये, आणि आनंदाच्या वातावरणात पार पडले. म्हात्रे कुटुंबियांतील सर्व लहान थोर, जेष्ठ मंडळी, तरुण मित्र मंडळी, आणि माता भगिनी उपस्तित राहून घटस्थापनेच्या पूजा विधिला उपस्थित राहून कुलदैवत खंडोबा देवाचा कुलस्वामिनी तुळजा भवानी देवीचा आणि सर्वच देवदेवतांचा आशीर्वाद घेतला. नऊ दिवस चालणाऱ्या या नवरात्री उत्सवात सर्व म्हात्रे कुटुंबीय, नातेवाईक, भावबंध, आणि माता भगिनी मोठ्या उत्साहात मंदिरात उपस्थित राहून देव देवतेची सेवा करत असतात. दर दिवशी ( रात्री ) कुलदैवत मंदिरामध्ये वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करत असतात. सर्व भक्तगण आपआपली सर्व कामे ऍडजेस्ट करून, आरती, जागरण, प्रसाद, व नैवेद्य आणून देवाला अर्पण करतात. मग ते नैवेद्य प्रसाद म्हणून ( आल्पोपहार / नाष्टा ) सर्वांना वाटप करतात. विशेष म्हणजे सर्वच खंडोबा भक्त, आणि दुर्गा मातेच्या उपासक माता भगिनी वेगवेगळे आर्थिक, वस्तू रूपाने, किंवा इतर मदत करून, एकमेकांना सहकार्य करतात हे विशेष.एकंदरीत सर्व म्हात्रे कुटुंबियांच्या, भावाबंध मंडळी, बच्चे कंपनी, सर्व तरुण मित्र मंडळी, माताभगिनी, आणि सर्व भक्तगण यांच्या सहकार्याने नवरात्र उत्सव अतिशय आनंदात आणि भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे.



## जिल्हास्तरीय बॉल बॅडमिंटन स्पर्धेमध्ये न्यू इंग्लिश स्कूल पोफळी प्रशालेचे घवघवीत सुयश



**संगमेश्वर । सत्यवान विचारे**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र व रत्नागिरी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्यावतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय बॉल बॅडमिंटन स्पर्धेमध्ये परशुराम एज्युकेशन सोसायटी संचलित न्यू इंग्लिश स्कूल पोफळी प्रशालेने घवघवीत सुयश प्राप्त केले. या स्पर्धेमध्ये १४ वर्षे मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवला. या संघाची निवड विभागीय स्पर्धेसाठी झाली. या संघामधील अवनी शिंदे, अनन्या कदम, अनन्या जाधव, परी जाधव ,श्रीया नरळकर या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ करून नामवंत संघाना पराभूत करून विजयश्री खेचून आणली.त्याचबरोबर १९ वर्षे वयोगट मुलींच्या संघाने जिल्हास्तरावर तृतीय*क्रमांक पटकावला . या संघामध्ये अनुष्का कदम, शर्वरी पवार ,वेदिका बामणे, रिया पवार व आदिश्री पवार या खेळाडूंचा समावेश होता. सर्व यशस्वी खेळाडूंना प्रशालेचे क्रीडा शिक्षक ,विज्ञान शिक्षक व समुपदेशक श्री प्रदीपकुमार यादव सर यांचे मार्गदर्शन लाभले. या संघाबरोबर व्यवस्थापिका म्हणून सौ ताम्हणकर मॅडम यांनी काम पाहिले. या सर्व खेळाडूंचे परशुराम एज्युकेशन सोसायटीचे सर्व पदाधिकारी , प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ पाटील मॅडम,वर्गशिक्षक श्री पी.एम.पाटील सर आणि सर्व शिक्षक, पालक यांनी अभिनंदन केले. आणि पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



**नवरात्रौ उत्सव, सुरु असून चौथ्या दिवशी पिवळा रंग परिधान करून शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा चिंबीपाडा तालुका भिवंडी जिल्हा ठाणे येथील शिक्षिका आणि महिला अधिक्षिका, शिक्षकोत्तर कर्मचारी**

# पिके सडली,नदीकाठी मातीच राहिली नाही; पंचनामे करता कशाचे?-खा.बजरंग सोनवणे यांचा सवाल

## राष्ट्रवादीच्या प्रदेशाध्यक्षांसोबत बांधावर जावून केली नुकसानीची पाहणी

**बीड । शंकर जाधव**

दहा दिवसांपासून जिल्ह्यात अतिवृष्टी होत आहे.यामुळे नद्यानाल्यांना महापूर गेला. परिणामी, पाण्यामुळे पिके सडली आहेत. अनेक ठिकाणी मातीही खरडून गेली आहे. अशावेळी पंचनामे कशाचे करता, असा सवाल खा.बजरंग सोनवणे यांनी उपस्थित केला. शिवाय ओला दुष्काळ जाहिर करून सरसकट मदत द्या, अशी मागणीही त्यांनी केली.

राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आ.शशिकांत शिंदे हे बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या भेटीसाठी आणि नुकसानपाहणीसाठी दौऱ्यावर आले होते. यावेळी खा.बजरंग सोनवणे, आ.संदिप क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, माजी आ.सलीम भाई, मेहबूब शेख ,उषाताई दराडे, सुशीलाताई मोराळे आदी प्रमुख पदाधिकारी सकाळपासून या दौऱ्यात सहभागी होते. बीड तालुक्यातील पिंपळवाडी, दत्तनगर, बेलखंडी, नागझरी, शिरापूर गात, शिरूर,



आर्वी, नवगण राजुरी येथील व्यापारी व आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांची संवाद साधला. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, बीड जिल्ह्यात दहा दिवसातून किमान पाच दिवस अतिवृष्टी झाली आहे. शिरूर तालुक्यातून वाहणारी सिंदफणा, पाटोदा तालुक्यातून वाहणारी मांजरा नदीने रौद्ररूप धारण केले होते. नदीकाठी असलेल्या गावात पाणी शिरले. शेतातील पिके, जमीन, विहीरी डोळ्यादेखत वाहून गेल्या. कधी नव्हे इतके पाणी नागरिकांनी पाहिले. जिल्ह्यात जवळपास साडेतीनशे कोटींचे शासकिय मालमत्तेचे नुकसान झालेले आहे. तर शेतकऱ्यांचे, व्यापाऱ्यांचे नुकसान किती असेल, याचा अंदाज येत नाही.यामुळे सरकारने पंचनामे करत बसण्यापेक्षा ओला दुष्काळ जाहिर करून सरसकट मदत करावी, अशी मागणीही खा.बजरंग सोनवणे यांनी केली.

यावेळी प्रदेशाध्यक्ष आ.शशिकांत शिंदे म्हणाले, बीड जिल्ह्यात शेतकरी बांधवांचे प्रचंड नुकसान झाले असून या अस्मानी संकटातून शेतकऱ्यांना सक्षमपणे उभे करण्यासाठी ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. परंतु सरकार शेतकऱ्यांच्या वेदनांकडे शासन लक्ष देत नसल्याचे चित्र समोर आल्याने प्रचंड आक्रोश शेतकरी बांधवांमध्ये आहे. सत्ताधाऱ्यांनी निवडणुकीपूर्वी दिलेल्या वचनाप्रमाणे शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आधार द्यावा. राज्य सरकार व ठोस पाऊल उचलत नसेल तर सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या बरोबर राष्ट्रवादी काँग्रेस खांद्याला खांदा देऊन उभी राहणार आहे. नाशिकप्रमाणे बीडमध्ये सुद्धा पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या उपस्थितीत बीडमध्ये महामोर्चा काढला जाईल, अशी माहिती यावेळी आमदार शशिकांत शिंदे यांनी दिली.

# देवरुखातील सोने व्यापाऱ्याला लुटणाऱ्या टोळीतील चौघांना अटक

## देवरुख पोलिसांचे बदलापूर व पनवेल येथे छापे; लाखोंचा मुद्देमाल जप्त

**संगमेश्वर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यात सोन्याचे व्यापारी धनंजय गोपाळ केतकर (वय ६३, रा. मार्लेश्वर फाटा, देवरुख) यांच्यावर झालेल्या धक्कादायक लुटमारी प्रकरणाचा तपास अवघ्या काही दिवसांत उकलत देवरुख पोलिसांनी मोठी कामगिरी केली आहे. बदलापूर व पनवेल येथे छापे टाकून पोलिसांनी या गुन्ह्यातील चार आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून स्कॉर्पिओ वाहन, पाच मोबाईल हँडसेट व १ लाख २० हजार रुपये रोख असा मिळून एकूण ६ लाख ७५ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे./दिनांक १७ सप्टेंबर रोजी रात्री १०.३० ते १०.४५ च्या सुमारास केतकर हे आपल्या मर्सिडिज कार (एमएच-०१-ई-८०१२) मधून घरी जात असताना वांझोळे गावाजवळ पांढऱ्या रंगाच्या कारने त्यांना आडवले. अनोळखी पाच इसमांनी जबरदस्तीने त्यांना गाडीत बसवून, त्यांच्या गळ्यातील सुमारे १६ लाख रुपये किमतीच्या सोन्याच्या तीन चैन व खिशातील २० हजार रुपये रोख रक्कम हिसकावून घेतली. त्यानंतर



त्यांच्याकडून ५ लाख रुपयांची खंडणीची मागणी करत, डोक्यात कठीण वस्तू मारून दरीत टाकून देण्याची धमकी दिली. अखेर १८ सप्टेंबर रोजी रात्री १२.३० च्या सुमारास वाटुळ गावच्या रस्त्यावर त्यांना सोडून देण्यात आले./केतकर यांनी देवरुख पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून त्यावरून गुन्हा क्र. १०४/२०२५ भादंवि कलम ३०९(४), ३१०(१), ३११, १४२(२), १२७(२), ११५(२), ३५१(२) प्रमाणे दाखल करण्यात आला./घटनेनंतर तातडीने पोलीस अधीक्षक श्री. नितीन दत्तात्रय बगाटे यांनी विशेष तपास पथके तयार करून तपासाचे आदेश दिले. अपर पोलीस अधीक्षक श्री. बी.बी. महामुनी यांनी घटनास्थळी भेट देऊन मार्गदर्शन केले. तपासादरम्यान पोलिस हवालदार विजय आंबेकर यांनी मिळवलेल्या तांत्रिक व गोपनीय माहितीनुसार आरोपी बदलापूर येथे वास्तव्यास असल्याचे निष्पन्न झाले. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा व देवरुख पोलिसांनी संयुक्त कारवाई करून बदलापूरहून दोन आरोपींना अटक केली. त्यांच्या चौकशीतून आणखी दोन आरोपींचा ठावठिकाणा लागून त्यांना पनवेल येथून अटक करण्यात आली./अटक आरोपींच्या ताब्यातून पोलिसांनी एक स्कॉर्पिओ वाहन, पाच मोबाईल हँडसेट व १ लाख २० हजार रुपये रोख असा एकूण ६ लाख ७५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नितीन बगाटे, अपर पोलीस अधीक्षक श्री. बी.बी. महामुनी, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. सुरेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन ढेरे, देवरुख पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उदय झावरे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कामगिरी केली.या मोहिमेत श्रे.पो.उनि. संदीप ओगले, पोलीस हवालदार विजय आंबेकर यांच्यासह पांडुरंग गोरे, नितीन डोमणे, विनायक राजवैद्य, विक्रम पाटील, गणेश सावंत, योगेश नार्वेकर, प्रविण खांबे, विवेक रसाळ, योगेश शेट्ये, अतुल कांबळे, रमिज शेख, शितल पिंजरे, दत्ता कांबळे, प्रशांत बोरकर, सुभाष भागणे, शांताराम झोरे, बाळू पालकर, सत्यजित दरेकर, दिपराज पाटील, अमित कदम, भैरवनाथ सवाईराम, विनोद कदम, निलेश शेलार यांच्यासह अनेक अधिकाऱ्यांनी मोलाची भूमिका बजावली.

# आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान

## लोकसहभागातून स्वावलंबी राष्ट्र उभारणीचा संकल्प करूया–भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान देशभर सुरू होत आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती २५ सप्टेंबर ते भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी जयंती २५ डिसेंबर या काळात हे अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाचा उद्देश प्रत्येक भारतीयाला स्वदेशी संकल्पाशी जोडणे, लोकसहभागातून राष्ट्रनिर्मितीला गती देणे आणि वोकल फॉर लोकल चा संदेश घराघरात पोहोचवणे असल्याचे प्रतिपादन भाजपा महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष आणि डोंबिवलीचे आमदार रविंद्र चव्हाण यांनी डोंबिवलीत केले. नमो रमो या महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या गरबा कार्यक्रमस्थळी घर घर स्वदेशी हा संदेश देणाऱ्या महाकाय आकाश फुग्याचे अनावरण या वेळी चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.



आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान अंतर्गत राष्ट्रीय, राज्य, जिल्हा आणि मंडल पातळीवर कार्यशाळा, महिला व युवा संमेलन, व्यापारी व उद्योग परिषद, स्वदेशी मेळावे तसेच आत्मनिर्भर भारत संकल्प रथ यांसारखे विविध कार्यक्रम देशभर होणार आहेत. शेतकरी, महिला, युवक, कारागीर, छोटे दुकानदार, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक क्षेत्र तसेच व्यापारी व उद्योग क्षेत्र यामध्ये सक्रिय सहभाग होणार असून घर घर स्वदेशी या भावनेतून स्वदेशी उत्पादनांचा प्रसार, लघुउद्योगांना प्रोत्साहन आणि स्थानिक उद्योजकांना आधार देणे हा अभियानाचा मुख्य उद्देश राहणार असल्याचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सांगितले.या उपक्रमांतर्गत प्रत्येक जिल्ह्यात जनजागृती मोहीम, स्पर्धा, परिसंवाद, स्वदेशी मेळावे तसेच सोशल मीडियावर जनसंपर्क अभियान राबवले जाईल. मी फक्त स्वदेशी स्वीकारतो हा संकल्प लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, युवक व महिला यांच्याकडून करण्याचे नियोजन असल्याचे ते म्हणाले. या निमित्ताने Ghar GharSwadeshi, -tmanirbhar Bharat आणि VocalForLocal या हॅशटॅग्सद्वारे या चळवळीला डिजिटल बळ दिले जाणार असून या अभियानाच्या माध्यमातून देशाची आर्थिक प्रगती, सांस्कृतिक ओळख आणि सामाजिक आत्मनिर्भरता अधिक बळकट करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.समस्त महाराष्ट्रवासियांना नवरात्रीच्या शुभेच्छा देताना डोंबिवलीतील नमो रमो नवरात्रीच्या निमित्ताने गेली ८ वर्षे स्थानिक कारागीर, उत्पादक, महिला बचतगट आणि व्यावसायिकांना अगोदरपासूनच पाठबळ देत असल्याचे चव्हाण यांनी आवर्जून सांगितले. या प्रसंगी भाजपा कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब, भाजपा महाराष्ट्र प्रदेश अनुसूचित जाती मोर्चा सरचिटणीस शशिकांत कांबळे, मंडल अध्यक्ष मितेश पेणकर, करण जाधव, धनाजी पाटील, प्रिया जोशी, शक्तिवान भोईर, रितेश फडके, पवन पाटील, लक्ष्मण पंत, परेश तेलंगे, विश्वजीत करंजुले, नितेश म्हात्रे, स्वप्निल काटे, समीर भंडारे, नवनाथ पाटील, माजी नगरसेवक मुकुंद पेडणेकर तसेच सर्व पदाधिकारी आणि भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

# दिवा रेल्वे स्थानकात लोकलच्या छतावर तरुणाला विद्युत तारेचा झटका

**संतोष पडवळ । ठाणे**

मध्य रेल्वे मार्गावरील दिवा रेल्वे स्थानकात न वातानुकूलित (एसी) रेल्वे गाडीच्या छतावर बसलेल्या तरुणाला विद्युत तारेचा झटका लागला. या घटनेत तो जखमी झाला असून त्याला उपचारासाठी मुंबईतील शीव रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे रेल्वे वाहतुकीवर काहीकाळ परिणाम झाला होता. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून कल्याणच्या दिशेने वातानुकूलित रेल्वेगाडी निघाली होती. ही रेल्वेगाडी मंगळवारी सकाळी १०.१५ च्या सुमारास दिवा रेल्वे स्थानकावर आली असता एक व्यक्ती पान ४ वर रेल्वे गाडीच्या छतावर बसल्याचे आढळून आले. प्रवाशांनी तात्काळ याची माहिती प्रशासनाला दिल्यानंतर रेल्वे सुरक्षा दलाचे जवान (आरपीएफ), रेल्वे प्रशासनातील इतर कर्मचारी दाखल झाले. प्रवासी आणि कर्मचारी तरुणाला छतावरुन उतरण्याची विनंती करत असतानाच, त्याला विद्युत



तारेचा झटका बसला. त्याला तात्काळ उपचारासाठी ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराजरुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर त्याला पुढील उपचारासाठी मुंबईतील शीव रुग्णालयात नेण्यात आले.

# कर्जत शहराच्या टेकडीवरील श्री वेदमाता

**कर्जत । जयेश जाधव**

कर्जत शहराच्या मध्यवर्ती ठिकाण टेकडीवर आहे या टेकडीवर श्री वेदमातेचे मंदीर आहे, नवरात्रीत नऊ दिवस मंदीरात विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होतात.वारकरी सांप्रदाय परंपरा लाभलेले, वारकरी शिक्षण संस्था श्री क्षेत्र आळंदीचे मुख्य प्रवर्तक, ज्ञानेश्वरीकार आणि किर्तनकार गुरुवर्य वै. ह. भ. प. मामासाहेब दांडेकर यांचे परम शिष्यत्व लाभलेले सद्गुरु वै.ह.भ.प. योगीराज श्रीमान गजानन महाराज अटक यांनी श्री क्षेत्र आळंदी येथे वारकरी शिक्षण संस्थेत तीन वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करुन गुरु आज्ञेने कर्जत परिसरात जगत कल्याणाचे कार्य करणेकरिता नियुक्ती केली. अध्यात्म ज्ञान, भक्ती मार्ग, नामस्मरण, प्राणायाम, ध्यान साधना आदी ज्ञानदानाचे कार्य सुरु केले, हे कार्य त्यांनी मुद्रे येथून सुरु केले. दामू बैलमारे हे अतिशय पिशाच बाधाने पिडीत होते, यावर काहीतरी उपाय व्हावा म्हणून महारांजाना विनंती केल्याने त्यांनी श्री गुरु चरित्र ग्रंथाचे पारायण करण्याचे प्रायोजन करुन दामू बैलमारे यांना पिशाच्च बाधा मुक्त केले. या कामी त्यांनी भोवतालच्या देव देवतांच्या स्थानाचा विचार करता या देवी स्थानाची ओळख झाली.ओळख करुन देताना श्रीमान अटक महाराज म्हणाले हे स्थान अतिशय महत्वाचे आहे, संपूर्ण विश्वाची विश्व शक्ती देवता आई वेदमाता आहे, हिला कोणी अन्नपुर्णा देवी तर कोणी आदिमाया शक्ती, तर कोणी मरिआई म्हणतात हिची स्थापना छत्रपती शिवाजी महाराज यांचे धर्मगुरु संतश्रेष्ठ रामदास स्वामीनी स्थापन केलेले हे पुरातन स्थान जागृतस्थान आहे, दोन हात जोडून माथा टेकवून नमस्कार आणि शुध्द भावाची आवश्यकता आहे, देवी प्रसन्न होवून भक्त गणांची मनोकामना पुर्ण करणारी देवता आहे.मुद्रे ग्रामस्थ व कर्जत परिसरात हे स्थान माथ्यावरील देव म्हणून फार पुर्वीपासून प्रख्यात होते, हे पुरातन स्थान असून या ठिकाणी मुद्रे ग्रामदेवता म्हणून प्रत्येक शुभकार्यात नारळ, विडा, अगरबत्तीने पुजा केली जाते ही परंपरा आजपर्यंत सुरु आहे. श्रीमान गजानन महाराज यांनी ओळख करुन दिली तो दिवस माहे मे १९८८ वैशाख कृ३ संकष्टी चतुर्थी या दिवसापासून वैष्णव संस्कार केंद्राचे सेवक व मुद्रे ग्रामस्थ यांचे वतीने एक दिवस ज्ञानयज्ञ सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करतात, त्याच बरोबर विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.



# महेंद्र थोरवे यांची आमदारकी कायम घारेंची याचिका हायकोर्टाने फेटाळली!

**कर्जत । जयेश जाधव**

आ.महेंद्र थोरवे यांच्या विजयाला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. पराभूत उमेदवार सुधाकर धारे यांनी आ. थोरवेंचा विजय रद्द करण्यासाठी याचिका दाखल केली होती. न्यायालयाच्या निकालानंतर महेंद्र थोरवे यांचा विजय कायम राहिला आहे. त्यामुळे त्यांच्या कार्यकर्त्यांनी जोरदार जल्लोष साजरा केला आहे.

२०२४ च्या कर्जत विधानसभा मतदारसंघात शिवसेना महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे विजयी ठरले होते. या निवडणुकीत केवळ ५ हजार ७०० मतांच्या अल्पाधिक्याने विजय मिळाल्यानंतर पराभूत अपक्ष उमेदवार सुधाकर घारे यांनी याचिका दाखल केली, महेंद्र थोरवे यांनी आपला विजय हिरावण्यासाठी डमी उमेदवार उभा करून



निवडणूक प्रक्रियेत फेरफार केला असा आरोप करण्यातआला होता. या याचिकेवर गेल्या सहा महिन्यांपासून मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी सुरू होती.अखेर ही याचिकेच न्यायालयाने फेटाळून लावल्यामुळे सुधाकर घारे यांचा अपेक्षाभंग झाला आहे. त्यांच्या पक्षियांच्या जल्लोषावर पाणी फेरले आहे. चार दिवसांपूर्वी सुधाकर घारे यांनी कर्जतमध्ये जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने जोरदार शक्तिप्रदर्शन करून आपणच कर्जत मतदारांचे एकमेव प्रतिनिधी आहोत असे दाखवण्याचा प्रयत्न केला होता. मुख्य भाषणात पक्षाचे राज्य अध्यक्ष सुनील तटकरे यांनी सुधाकर घारे यांना मताधिक्य असल्याचे जाहीर केले होते. मात्र मुंबई उच्च न्यायालयाच्या दणक्यानंतर या विधानाचे वजन कमी झाले आहे.

आ. थोरवे यांच्या विरोधातील याचिकाच फेटाळण्यात आल्यानंतर कर्जत आणि खालापूर तालुक्यातील शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये जल्लोष केला आहे. तसेच आगामी जिल्हा परिषद, तालुका पंचायत समित्या, तीन नगरपरिषद, एक नगरपंचायत आणि दोन्ही तालुक्यातील साधारण ५० ग्रामपंचायतींच्या निवडणुकांवर या निकालाचा प्रभाव पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

कर्जत विधानसभा मतदारसंघातील राजकीय समीकरणे अधिक स्पष्ट झाली असून, विद्यमान आमदार महेंद्र थोरवे यांचा राजकीय प्रभाव दृढ राहणार असल्याचे मत राजकीय विश्लेषक व्यक्त करतात.

# केवळ पर्यटनाला जाऊ नका शेतकऱ्यांना काही मदत करा–शिंदे

**मुंबई (वृत्तसंस्था)**–शेतकऱ्यांना संकटाच्या काळात मोठी मदत देणे अपेक्षित आहे. ज्यांना मदत द्यायची असेल त्यांनी मदत घेऊन नक्की शेतकऱ्यांच्या बांधावर जावे. मात्र, केवळ पर्यटनासाठी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊ नये, अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या मराठवाडा दौऱ्यावर टीका केली आहे. सध्या संकटाची वेळ आहे. अशावेळी ज्याला जेवढी शक्य आहे, त्याने तेवढी मदत देणे अपेक्षित आहे. मात्र विरोधक केवळ मदत देणाऱ्यांवर टीका करण्याचे काम करत असल्याचा आरोप त्यांनी केला.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल पूरग्रस्त भागातील काही जिल्ह्यांचा दौरा करत पूरग्रस्त भागाची पाहणी केली होती. त्यानंतर आज उद्धव ठाकरे हे देखील पूरग्रस्त मराठवाड्यात पाहणी दौऱ्यासाठी येत आहेत. मात्र उद्धव ठाकरे यांच्या दौऱ्यापूर्वीच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या दौऱ्यावर टीका केली आहे.काही लोक केवळ पर्यटनासाठी दौरा करत असल्याची टीका त्यांनी केली. आम्ही शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी ज्या वस्तू देत आहोत, त्या बघा. त्यावरील फोटो कशासाठी बघता? असा प्रतिप्रश्न त्यांनी उपस्थित केला. कार्यकर्त्यांनी फोटो लावले असतील, पण ते पाहण्याऐवजी मदतीसाठी दिलेले साहित्य पहा. सध्या संकटातील शेतकऱ्यांना मदत देणे हे जास्त महत्त्वाचे आहे. कोणी कोणत्या पद्धतीने मदत दिली, यापेक्षा शेतकऱ्यांना मदत मिळणे हे जास्त महत्त्वाचे असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.एकीकडे शेतकरी संकटात आहे. अशावेळी राज्य सरकार आणि सर्वच मंत्री शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी त्यांचे दुःख समजून घेण्यासाठी प्रयत्न करत आहेत. तर दुसरीकडे काही लोकांना विरोधी पक्ष नेते पदाचे पडले असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. या माध्यमातून एकनाथ शिंदे यांनी संजय राऊत यांच्यावर देखील निशाणा साधला. सरकार विरोधी पक्षनेतेपद देत नसल्या वरुन संजय राऊत यांनी काल राज्य सरकारवर टीका केली होती. यावर एकनाथ शिंदे यांनी संजय राऊत यांच्यावर पलटवार केला आहे.

# राज्यातील पहिलं क्रिपटोकरंसी गुन्हे अन्वेषण कक्ष ठाण्यात सुरु

**संतोष पडवळ । ठाणे**

गेले काही वर्षांपासून सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत चालले आहे. या सायबर गुन्ह्यांचा तपास करत असताना, गुन्हेगार गुन्ह्यांतील रक्कमेचा क्रिप्टोकरंसीच्या माध्यमातून अपहार करत असल्याचे आढळून येते. त्यामुळे अपहारित रक्कमेचा माग काढणे आणि ती रक्कम हस्तगत करणे पोलिसांना अवघड जात आहे.यासाठी क्रिप्टोकरंसी संबधीत तज्ज्ञांची आवश्यकता लक्षात घेवून ठाणे शहर पोलीस आयुक्त यांनी ठाणे पोलीस आयुक्तालयात प्रथमच सायबर पोलीस ठाणे येथे 'क्रिप्टोकरंसी अन्वेषण कक्षाची' स्थापना केली आहे. महाराष्ट्रातील हे पहिले क्रिप्टोकरंसी अन्वेषण कक्ष असल्याची माहिती ठाणे पोलीस आयुक्तालयातून देण्यात आली.अलीकडच्या काळातील सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन ठाणे शहर पोलीस आयुक्त यांच्या संकल्पनेतून ठाणे पोलीस आयुक्तालयात होणाऱ्या सायबर गुन्ह्यांचे तपासासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात यापूर्वी सायबर कक्ष स्थापन करण्यात आला




आहे. परंतू, या गुन्ह्यांच्या तपासासाठी सायबर तज्ज्ञ आवश्यक असल्याची बाब लक्षात घेवून त्यांनी प्रत्येक पोलीस ठाण्यात दोन सायबर तज्ज्ञांची नेमणूक केली.या कक्षामध्ये आर्थिक गुन्हे शाखा आणि सायबर पोलीस ठाण्यातील क्रिप्टोकरंसीबाबत विशेष प्राविण्य असलेल्या पोलीस अधिकारी तसेच अंमलदार यांची नेमणूक करण्यात आली आहे. हे अधिकारी पोलीस आयुक्तालयातील पोलीस ठाण्यांमध्ये सायबर गुन्ह्यांचा तपास करणाऱ्या सर्व तपास अधिकाऱ्यांना क्रिप्टोकरंसी संबंधाचे प्रशिक्षण देणार असून तपासातही मदत करणार आहेत. त्यामुळे फसवणूकीच्या गुन्ह्यांना आळा बसण्यास मदत होणार आहे. क्रिप्टोकरंसी अन्वेषण कक्षाचे उद्घाटन २४ सप्टेंबर रोजी करण्यात आले. यावेळी ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, सहाय्यक पोलीस आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण, पोलीस उपायुक्त पराग मणेरे, आर्थिक गुन्हे शाखा आणि सायबर सेल, ठाणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त दत्तात्रय पाबळे, वरिष्ठ पोलीस निरिक्षक प्रकाश वारके हे उपस्थित होते.

# स्वच्छता ही सेवा' या अभियानास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## स्वच्छता ब्रँड म्बेसेंडर श्रीकांत वाड, रवींद्र प्रभूदेसाई झाले सहभागी

**संतोष पडवळ । ठाणे**

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधत संपूर्ण देशभरात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छता ही सेवा हा पंधरवडा सुरू आहे, या अभियानातंर्गत ठाणे महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग व ठाणे पोलीस आयुक्तालय यांच्या संयुक्त विद्यमाने आज कापूरबावडी परिसरातील धार्मिक स्थळे, तसेच पोलीस ठाणे परिसरात स्वच्छता ही सेवा हे अभियान राबविण्यात आले. एक दिन, एक घंटा, एक साथ हे या अभियानाचे घोषवाक्य असून नागरिकांमध्ये स्वच्छतेची भावना निर्माण व्हावी हा असून प्रत्येक नागरिकांनी स्वच्छता ही आपली जबाबदारी आहे या भावनेने यात सहभागी व्हावे असे आवाहन खासदार नरेश म्हस्के यांनी यावेळी केले. कापूरबावडी परिसरात राबविण्यात आलेल्या या मोहिमेत खासदार नरेश म्हस्के, आमदार संजय केळकर, महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे, उपायुक्त मनीष जोशी, दिनेश तायडे, सहाय्यक आयुक्त सोनल काळे, आरोग्य अधिकारी डॉ.




राणी शिंदे, स्वच्छता ब्रँड म्बेसेंडर श्रीकांत वाड, रवींद्र प्रभूदेसाई, महापालिकेचे अधिकारी कर्मचारी तसेच विविध शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी उपस्थित सर्वांनी स्वच्छतेची शपथ घेतली. यावेळी कापूरबावडी येथील आशापुरा धाम मंदिर परिसरातील साफसफाई करण्यात आली, तसेच कापूरबावडी परिसराची देखील स्वच्छता करण्यात आली. तसेच याच परिसरात खासदार नरेश म्हस्के, आमदार संजय केळकर, महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले, तसेच दर्गा व चर्च परिसर देखील स्वच्छ करण्यात आला. ठाणे महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागातर्फे स्वच्छता ही सेवा – स्वच्छोत्सव २०२५ या राष्ट्रीय अभियानांतर्गत विविध स्वच्छता व जनजागृती उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमांचा उद्देश नागरिक सहभाग वाढवणे, पर्यावरण संवर्धन करणे आणि आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करणे हा असल्याचे आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले. स्वच्छतेचे ब्रँड म्बेसेंडर श्रीकांत वाड आणि रविंद्र प्रभुदेसाई यांनी विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी नागरिकांना स्वच्छता ही सेवा मोहिमेत सहभागी होण्यासाठी प्रेरित केले आणि स्वच्छतेच्या संदेशाचा प्रसार केला.

दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटींग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को–ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफीस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५ व्यवस्थापक अभय दत्ताराम वरणकर जाहिरात व्यवस्थापक संतोष सदाशिव कदम